**तक्रार यूएलपी क्र ८७/२०२०.**

**नि क्र यूडब्ल्यू १ श्रीमती संगीता राजेंद्र शिंदे .**

शपथेवर कथन करतो की;

**माझे नाव श्रीमती संगीता राजेंद्र शिंदे**.

वय. ३३ राहणार.सिंदफळ; ता.तुळजापूर; जि.उस्मानाबाद आज मुक्कामी सोलापूर.

मी याकामी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि क्र यूडब्ल्यू १ खाली दाखल केले असून ते मी वाचले आहे त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. प्रतिज्ञापत्रावर माझी सही आहे. मला प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त अन्य काही सांगायचे नाही.

**<u>पुढील सरतपास तक्रारदारातर्फे श्री व्ही आर देशपांडे विधिज्ञ यांचेतर्फे</u>**

१४. आता मला कागदपत्र यादी नि क्र यू ९ दाखविण्यात आला. अ क्र १ वरती सवौपचार रुग्णालय उस्मानाबाद यानी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले आहे ते **<u>नि क्र यू ११</u>** वरती आहे. अ क्र २ वरती सामनेवाले यांनी दि ०८.०४.२०१७ रोजी दिलेला आदेशाची प्रत **<u>नि क्र यू १२</u>** वरती आहे. अ क्र ३ वरती सामनेवाले यांनी दि १८.०४.२०१८ रोजी दिलले पत्र **<u>नि क्र यू १३</u>** वरती आहे. अ क्र ४ वरती दि ११.०५.२०१८ रोजी माझे पती यांनी दिलेला अर्ज **<u>नि क्र यू १४</u>** वरती आहे अ क्र ५ वरती सामनेवाले यांच्या विभागीय आस्थापना आदेश दि.१०.०९.२००८ **<u>नि क्र यू १५</u>** वरती आहे.

**<u>उलटतपासणी सामनेवाले श्री एस डी होसमनी विधिज्ञ यांचेतर्फे</u>**

१५. हे म्हणणे खरे आहे की मूळ तक्रारदार राजेंद्र नरहरी शिंदे प्रथमत

दि २१.०७.१९९९ पंढरपूर डेपो येथे चालक म्हणून कामास लागले त्यांचा चालक क्रमांक ७११ होता.  हे म्हणणे खरे आहे की माझे पती दि.०६.१०.२०१५ ते दि. ०२.०४.२०१६ या कालावधीत बार्शी येथे कामावर असताना रक्तदाबाचा त्रास जाणवत होता. हे म्हणणे खरे आहे की त्यांना वैद्यकीय तपासणीकरिता श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर येथे तपासणीकरिता पाठविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की तपासणी दरम्यान लहान मेंदूच्या उजव्या बाजूच्या डोळयाच्या पापणीच्या पॅरेलिसिस अर्धांगवायू दृष्टीदोष निर्माण झाल्यामुळे उजव्या कानाला बहिरपणा आलेला होता. हे म्हणणे खरे आहे की वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना चालक म्हणून अपात्र ठरविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की माझे पती यांनी त्यांना दि १५.०२.२०१७ रोजी सेवेतून कमी केल्यामुळे कमी करण्याचा आदेश कोणत्याही न्यायालयाने आव्हानित केला नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर माझे पतीने डिझेल पंपावर हलके काम मागणी केली होती. साक्षीदार स्वतहून सांगते की डिझेल पंपावरती काम मागणी केली नव्हती मात्र शिपाई म्हणून काम देण्याची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की माझे पतीने किंवा अन्य पदावरती नेमणुक करुन सुध्दा चालक पदाचाच पगार देण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की माझे पतीच्या अर्जानुसारच त्यांना डिझेल पंपावरती सहायक म्हणून काम दिले होते. हे म्हणणे खरे आहे की दि.१५.०२.२०१७ ते दि १२.०५.२०१८ या कालावधीत असाधारण बिनपगारी रजा गणण्यात आले आहे. हे मला माहित नाही की वरील कालावधी माझे पतीची शिवाय अखंडित समजण्यात आले अगर

कसे. हे म्हणणे खरे नाही की सामनेवाले यांनी कोणताही अनुचित कामगार प्रथांचा अवलंबलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**

**फेरतपास काही नाही**

सही/-
(मु.रा.कुंभार)
सदस्य
औद्योगिक न्यायालय सोलापूर

सोलापूर.
दिनांक.०१.०८.२०२५
*माकम*